Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849224

# भारतीय कृषी अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विकास यांमधील परस्परसंबंध : एक विश्लेषणात्मक अध्ययन

**गजानन निवृत्ती डुकरे**[1]

**गोषवारा :**

भारतीय अर्थव्यवस्थेची रचना ग्रामीण व कृषी प्रधान स्वरूपाची असून कृषी अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विकास हे परस्परावलंबी घटक आहेत. प्रस्तुत संशोधनात कृषी क्षेत्र व ग्रामीण विकास यांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करून त्यांच्या सामाजिक-आर्थिक परिणामांचे विश्लेषण करण्यात आले आहे. भारतातील मोठा लोकसमूह ग्रामीण भागात वास्तव्यास असून उपजीविकेसाठी कृषी व संबंधित क्षेत्रांवर अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाची गती मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्राच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहते. कृषी व अकृषी क्षेत्रातील समन्वय, पायाभूत सोई - सुविधांचा विकास, रोजगारनिर्मिती व प्रभावी धोरणात्मक अंमलबजावणी यांच्या माध्यमातूनच शाश्वत व समतोल ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो.

**मुख्य शब्द :** कृषी अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास, कृषी कामगार, दारिद्र्य.

**प्रस्तावना :**

खेड्यांचा देश म्हणून भारताची ओळख असून भारतीय अर्थव्यवस्था ही मुख्यत: ग्रामीण अर्थव्यवस्था आहे. (म. गांधींच्या मते, भारताचा आत्मा खेड्यांमध्ये वसतो. त्यामुळे कोणत्याही राष्ट्राचा खरा विकास शहरी नव्हे, तर ग्रामीण पुनर्रचनेतून साध्य होतो.) ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय कृषी आणि संलग्न क्षेत्र असून भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषी क्षेत्राचे महत्त्व ऐतिहासिक तसेच समकालीन काळातही कायम आहे. विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून ग्रामीण विकासाकडे पाहिले जाते. ग्रामीण विकासाचा अर्थ म्हणजे 'ग्रामीण भागाचा एकूण विकास' यामुळे जीवनमानाच्या गुणवत्तेत सुधारणा होते. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या 121 कोटी असून त्यापैकी ग्रामीण लोकसंख्या 83.25 कोटी (एकूण लोकसंख्येच्या 68.8 टक्के आहे) भारतातील मोठा लोकसंख्या घटक (54 टक्के) प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषी व संलग्न क्षेत्रावर अवलंबून आहे. ग्रामीण भारताचा आर्थिक - सामाजिक विकास प्राम्युख्याने कृषी उत्पादन, उत्पादकता, बाजार सुविधा, पायाभूत

[1]पीएच. डी. संशोधक, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

सोयी - सुविधा, धोरणात्मक हस्तक्षेप इ. घटकांवर अवलंबून असतो. उदारीकरणानंतर (1991) कृषी क्षेत्रात तांत्रिक प्रगती झाली असली तरीही उत्पन्नातील अस्थिरता, बदलते हवामान, बाजारपेठेतील असमानता, किमान आधारभूत किंमत धोरणाची अस्थिरता, कर्जबाजारीपणा, ग्रामीण रोजगाराच्या मर्यादा इ. समस्या कायम आहेत. या शोध निबंधाचा मुख्य उद्देश कृषी अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विकास यांच्यातील परस्पर संबंधाचे विश्लेषण करणे व धोरणात्मक दिशादर्शक सुचविणे हा आहे.

**संशोधनाची व्याप्ती व महत्त्व** :

प्रस्तुत संशोधनाकरिता भारतीय कृषी क्षेत्राची निवड करण्यात आली आहे. या लेखात ग्रामीण अर्थव्यवस्था व ग्रामीण विकास यांचा परस्पर संबंध स्पष्ट करते. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात असून त्यांची उपजीविका मुखत: कृषी व संलग्न क्षेत्रांवर अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत कृषी क्षेत्राची भूमिका समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. हे संशोधन कृषी उत्पन्नातील अस्थिरता, दारिद्र्य, बेरोजगारी, लोकसंख्या वाढ व जमीन तुकडीकरण यांसारख्या समस्यांचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम अधोरेखित करते. तसेच कृषी व अकृषी क्षेत्रातील समन्वय, रोजगारनिर्मिती आणि समावेशक विकासाकरिता प्रभावी धोरणांची गरज स्पष्ट करते. एकूणच, हे संशोधन ग्रामीण भारताच्या शाश्वत, समतोल व दीर्घकालीन विकासाकरिता मार्गदर्शक ठरते व शैक्षणिक तसेच धोरणात्मक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

**उद्दिष्टे :**

1. ग्रामीण विकासाची संकल्पना, व्याप्ती व घटकांचे सैद्धांतिक विश्लेषण करणे.
2. कृषी अर्थव्यवस्था व ग्रामीण विकास यांतील परस्परसंबंधाचे विश्लेषण करणे.
3. कृषी कामगार, दारिद्र्य व लोकसंख्या घटकांचा ग्रामीण विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित असून, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतींचा अवलंब केला आहे. विषयाशी संबंधित विविध साहित्याचा आढावा घेण्यात आला असून केंद्र व राज्य शासनाचे अहवाल, आर्थिक सर्वेक्षण अहवाल, कृषी मंत्रालयाची आकडेवारी, आर. बी. आय., नाबार्ड अहवाल, संशोधन लेख व शासनाच्या विविध संकेतस्थळावरून आवश्यक ती आकडेवारी व माहिती

संकलित केली आहे. संकलित केलेल्या दुय्यम आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, वार्षिक वृद्धीदर इ. सांख्यिकी साधनाचा उपयोग केला आहे.

**ग्रामीण विकास संकल्पना व घटक** :

'ग्रामीण विकास' या संकल्पनेचा उदय कृषी क्षेत्राशी निगडित आहे. परंतु ग्रामीण विकास म्हणजे केवळ कृषी क्षेत्रात वाढ नव्हे तर ग्रामीण पायाभूत सोयी - सुविधा, शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य, रोजगार, सामाजिक व आर्थिक जीवनमानाची उन्नती यांचा समन्वित विकास होय. ग्रामीण विकास हा शब्द ग्रामीण आणि विकास या दोन शब्दांपासून बनलेला असून त्याचा आशय गावाच्या समग्र विकासाशी संबंधित आहे. असा 'एक समुदाय जो निश्चित संख्येने ग्रामीण भागात राहतो त्यास गाव असे म्हणतात.' त्या गावचा सर्वांगीण विकास म्हणजे ग्रामीण विकास होय. ग्रामीण विकासाच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत, यातील काही पुढील प्रमाणे.

1. **जागतिक बँक :** "ग्रामीण विकास ही अशी रचना आहे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील विशिष्ट लोकांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्यास मदत होते तसेच उदरनिर्वाहाची पातळी उंचावण्यास मदत होते. यामध्ये कुळ, अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर इत्यादींचा समावेश होतो."

2. **संयुक्त राष्ट्र संघ :** "ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील गरिबी कमी करणे, रोजगाराच्या संधी वाढवणे, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि मानवी विकासाला चालना देणे होय."

3. **भारत सरकार :** "ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील कृषी, कृषीपूरक व्यवसाय, पायाभूत सोई - सुविधा, शिक्षण, आरोग्य व सामाजिक कल्याण यांचा समन्वय साधून जीवनमान उंचावण्याची प्रक्रिया होय." वरील व्याख्येवरुन आपणास असे म्हणता येईल की. ग्रामीण भागातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास म्हणजेच ग्रामीण विकास होय.

**ग्रामीण अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विकास यांचा परस्पर संबंध:**

**1. ग्रामीण लोकसंख्या व कृषी कामगार :**

ग्रामीण लोकसंख्या आणि कृषी ही कोणत्याही देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक रचनेचा कणा मानली जाते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ऐतिहासिकदृष्ट्या अधिक राहिलेले असून, कृषी, पशुपालन, वने व ग्रामीण हस्तव्यवसाय इ. वर उपजीविका अवलंबून

असलेला मोठा लोकसंख्या वर्ग ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. ग्रामीण लोकसंख्या केवळ संख्यात्मक दृष्ट्या महत्त्वाची नसून, अन्नसुरक्षा, रोजगारनिर्मिती, सामाजिक स्थैर्य व राष्ट्रीय विकासात तिची भूमिका अत्यंत मोलाची आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेची रचना ऐतिहासिकदृष्ट्या कृषी प्रधान राहिलेली असून, लोकसंख्या व कृषी कामगार यांच्यातील परस्परसंबंध हा ग्रामीण विकासाच्या अभ्यासाचा मूलभूत आधार मानला जातो. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येत लक्षणीय वाढ झाली असून, त्या तुलनेत कृषी क्षेत्रातील कामगारांच्या रचनेत व सहभागात महत्त्वपूर्ण बदल घडून आलेले दिसून येतात. लोकसंख्येतील वाढ, शहरीकरण, औद्योगिकीकरण तसेच सेवा क्षेत्राचा विस्तार यांचा थेट परिणाम कृषी क्षेत्रातील रोजगारावर झाला आहे.

**तक्ता क्र. 1**

**ग्रामीण लोकसंख्या व कृषी कामगारांची माहिती**

**(लोकसंख्या - दशलक्ष)**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | सरासरी वार्षिक लोकसंख्या वाढीचा दर (टक्के) | ग्रामीण लोकसंख्या | एकूण कामगार | कृषी कामगार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शेतकरी | शेतमजूर | एकूण |
| 1951 | 361.1 | 1.25 | 298.6 (82.7) | 139.5 | 69.9 (71.9) | 27.3 (28.1) | 97.2 (69.7) |
| 1961 | 439.2 | 1.96 | 360.3 (82.0) | 188.7 | 99.6 (76.0) | 31.5 (24.0) | 131.1 (69.5) |
| 1971 | 548.2 | 2.20 | 439.0 (80.1) | 180.4 | 78.2 (62.2) | 47.5 (37.8) | 125.7 (69.7) |
| 1981 | 683.3 | 2.22 | 525.5 (76.9) | 244.6 | 92.5 (62.5) | 55.5 (37.5) | 148.0 (60.5) |
| 1991 | 846.4 | 2.16 | 628.7 (74.5) | 314.1 | 110.7 (59.7) | 74.6 (40.3) | 185.3 (59.0) |
| 2001 | 1028.7 | 1.97 | 742.5 (72.2) | 402.2 | 127.3 (54.4) | 106.8 (45.6) | 234.1 (58.2) |
| 2011 | 1210.9 | 1.50 | 833.7 (68.9) | 481.9 | 118.8 (45.1) | 144.3 (54.9) | 263.1 (54.6) |

टीप : कंसातील आकडे टक्केवारीमध्ये

Source: Agricultural Statistics at a Glance (2024-25) Pp. 2

तक्ता क्र. 1 मध्ये एकूण लोकसंख्या, ग्रामीण लोकसंख्या आणि कृषी कामगार यांची माहिती देण्यात आली आहे. वरील माहितीवरुन असे निदर्शनास येते की, कृषी कामगारांच्या बाबतीत पाहिले असता, एकूण कामगारांपैकी कृषी कामगारांचा वाटा कालानुरूप घटताना दिसतो. 1951 मध्ये एकूण कामगारांपैकी सुमारे 69.7 टक्के कामगार कृषी क्षेत्राशी संबंधित होते, तर 2011 मध्ये हा वाटा 54.6 टक्क्यांपर्यंत घसरलेला आहे. विशेषतः शेतकरी व शेतमजूर यांच्या प्रमाणात झालेल्या बदलांमधून कृषी क्षेत्रातील संरचनात्मक परिवर्तन अधोरेखित होते. शेतकऱ्यांच्या प्रमाणात घट होत असताना कृषी मजुरांचे प्रमाण वाढलेले दिसते, जे ग्रामीण दारिद्रय, भूमिहीनता व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या वाढीचे द्योतक आहे.

**2. दारिद्रय :**

नियोजन मंडळाने सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर 2005 मध्ये तज्ज्ञ गट स्थापन केला. तज्ज्ञ गटांनी 8 डिसेंबर 2009 मध्ये अहवाल सादर केला आणि जानेवारी 2011 मध्ये भारत सरकारने या गटाच्या शिफारसी स्वीकारल्या. भारताने 2004-05 ते 2011-12 या कालावधीत दारिद्रय निर्मूलनात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. तथापि, राज्यनिहाय व ग्रामीण-शहरी स्तरावरील असमानता अजूनही मोठ्या प्रमाणात कायम आहे. त्यामुळे भविष्यातील विकास धोरणे ही प्रदेश, समाजघटक व ग्रामीण वास्तव यांचा विचार करून आखणे अत्यावश्यक आहे. 2004-05 मध्ये एकूण दारिद्रयाचे प्रमाण 37.2 टक्के (ग्रामीण 42.0 टक्के तर शहरी 25.5 टक्के) इतके होते, ते 2009-10 मध्ये घटून 29.8 टक्के (ग्रामीण 33.8 टक्के तर शहरी 20.9 टक्के) आणि 2011-12 मध्ये (ग्रामीण 25.7 टक्के तर शहरी 13.7 टक्के) 21.9 टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. ही घट आर्थिक सुधारणा, सामाजिक कल्याणकारी योजना, रोजगारनिर्मिती कार्यक्रम आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या विस्ताराचा परिणाम म्हणून पाहता येते. तथापि, ही प्रगती सर्व राज्यांमध्ये समान स्वरूपाची नाही. छत्तीसगड, झारखंड, बिहार, ओडिशा, मध्य प्रदेश इ. राज्यांमध्ये दारिद्रयाचे प्रमाण तुलनेने अधिक असून ही राज्ये प्रामुख्याने कृषी प्रधान, आदिवासी बहुल व औद्योगिकदृष्ट्या मागास असल्याचे आढळते. याउलट गोवा, केरळ, हिमाचल प्रदेश, पंजाब, सिक्कीम इ. राज्यांमध्ये दारिद्रयाचे प्रमाण अत्यल्प आहे, ज्याचे मुख्य कारण उच्च साक्षरता, मानवी विकास निर्देशांकातील प्रगती व सेवा क्षेत्राचा विकास हे आहे. ग्रामीण व शहरी दारिद्रयाच्या तुलनेत ग्रामीण भागातील दारिद्रय सर्वच कालखंडात अधिक असल्याचे स्पष्ट होते, ज्यामुळे ग्रामीण-शहरी विकासातील असमानता अधोरेखित होते. म्हणूनच दारिद्रय निर्मूलनाकरिता एकसमान धोरणाऐवजी प्रदेशनिहाय, ग्रामीण-केंद्रित व समावेशक विकास धोरणांची आवश्यकता असल्याचे वरील आकडेवारीवरुन स्पष्टपणे जाणवते.

**3. वाढती लोकसंख्या :**

भारतीय कृषी व्यवसाय हा मुख्यत: उपजीविकेवर आधारित, लहान व तुकड्यात विभागलेल्या जमिनीवर चालणारी, तसेच परंपरागत तंत्रज्ञानावर अवलंबून असलेली आहे. कृषी हा ग्रामीण भारतातील बहुसंख्य लोकांचा मुख्य उदरनिर्वाहाचा स्रोत असूनही उत्पादनक्षमता कमी राहण्यामागे अनेक संरचनात्मक व सामाजिक कारणे आहेत. जसे की, लोकसंख्या सातत्याने वाढत असताना भौगोलिक क्षेत्र (जमीन) मात्र स्थिर आहे.परिणामी प्रति व्यक्ती जमीन उपलब्धता घटत असून कृषीवर अवलंबून असलेली लोकसंख्या सातत्याने वाढल्याने जमिनीवरील दबाव वाढला आहे.

**तक्ता क्र. 2**

**भारतातील प्रति व्यक्ती जमीन उपलब्धतेची माहिती**

| **वर्ष** | **एकूण भौगोलिक क्षेत्र (द. ल. हे)** | **एकूण लोकसंख्या** | **प्रति व्यक्ती जमीन (हेक्टर)** |
|---|---|---|---|
| 1951 | 328.73 | 361.1 | 0.91 |
| 1961 | 328.73 | 439.2 | 0.75 |
| 1971 | 328.73 | 548.2 | 0.60 |
| 1981 | 328.73 | 683.3 | 0.48 |
| 1991 | 328.73 | 846.4 | 0.39 |
| 2001 | 328.73 | 1028.7 | 0.33 |
| 2011 | 328.73 | 1210.9 | 0.27 |

Source: Agricultural Crisis and farmers-friendly in India. Pp.18-19

तक्ता क्र. 2 मध्ये भारतातील प्रति व्यक्ती जमीन उपलब्धतेची माहिती दर्शविण्यात आली आहे. सन. 1951 मध्ये प्रति व्यक्ती जमीन 0.91 हेक्टर उपलब्ध होती ती 2011 मध्ये केवळ 0.27 हेक्टर या प्रमाणे उपलब्ध आहे. भारतीय शेतीमध्ये लहान व तुकड्यात विभागलेल्या जमिनी, लोकसंख्या वाढ, कर्जबाजारीपणा, आणि संरचनात्मक मर्यादा यांमुळे उत्पादनक्षमता कमी राहिली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन, यांत्रिकीकरण व गुंतवणूक यांचा पुरेसा लाभ लहान शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे जमीन एकत्रीकरण, पूरक व्यवसाय, आणि शाश्वत ग्रामीण विकास धोरणे राबविणे अत्यावश्यक ठरते.

**4. जमिनीचे तुकडीकरण :**

भारतातील कृषी संरचनेत सीमांत शेतधारणांचे प्राबल्य हे प्रमुख वैशिष्ट्य बनले आहे. वाढती लोकसंख्या, वारसाहक्क कायदे व जमिनीचे तुकडीकरण यामुळे मोठ्या शेतधारणांचे प्रमाण कमी होत असून, कृषी अधिकाधिक अल्प-भांडवली, कमी उत्पन्नाची व उपजीविकाभिमुख होत चालली आहे. याचा परिणाम कृषी उत्पादकता, यांत्रिकीकरण, उत्पन्न स्थैर्य आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर दीर्घकालीन स्वरूपात पडतो.

**तक्ता क्र. 3**

**शेतीधारणा आकारानुसार वर्गीकरण**

| **शेतीधारणा आकार गट** | **2005-06 (संख्या हजार)** | **2015-16 (संख्या हजार)** | **बदल** | **प्रवृत्ती** |
|---|---|---|---|---|
| सीमांत (1 हे. पेक्षा कमी) | 83694 (64.8) | 100251 (68.45) | 16557 | मोठी वाढ |
| लहान (1 - 2 हे.) | 23930 (18.5) | 25809 (17.62) | 1879 | अल्प वाढ |
| अर्ध मध्यम (2 - 4 हे.) | 14127 (10.9) | 13993 (9.55) | -134 | किंचित घट |
| मध्यम (4 - 10 हे.) | 6375 (4.6) | 5561 (3.80) | -814 | लक्षणीय घट |
| मोठे (10 हे. पेक्षा जास्त) | 1096 (0.8) | 838 (0.57) | -258 | सतत घट |
| **एकूण** | **129222 (100.0)** | **146454 (100.0)** | **17232** | **वाढ** |

टीप : कंसातील आकडे टक्केवारीमध्ये

Source: Agricultural Statistics at a Glance (2024-25) Pp. 368

तक्ता क्र. 3 मध्ये भारतातील शेतीधारणा आकारानुसार वर्गीकरणाची माहिती दर्शविण्यात आली आहे. यामध्ये 2005-06 ते 2015-16 या कालावधीत झालेला बदल तुलनात्मक अभ्यासण्यात आला आहे. सीमांत शेतधारणांचा प्रभाव स्पष्टपणे वाढलेला 2005-06 ते 2015-16 दरम्यान सीमांत शेतधारणांची संख्या 16.56 दशलक्षांनी वाढली, तसेच एकूण वाटा 64.8 टक्के वरून 68.45 टक्के झाला यामध्ये मोठी वाढ झाली आहे. मोठ्या व मध्यम शेतधारणांचे प्रमाण घटले मोठ्या शेतधारणांचा वाटा 0.8 टक्के वरून 0.57 टक्के झाला, तर मध्यम गटात संख्यात्मक व टक्केवारीतील दोन्ही घट आढळते. लहान व अर्ध-मध्यम गट तुलनेने स्थिर लहान शेतधारणांत संख्यात्मक वाढ असूनही टक्केवारीत किंचित घट

दिसते; अर्ध-मध्यम गटात जवळजवळ स्थैर्य / अल्प घट आहे. तर एकूण शेतधारणांची संख्या वाढली, पण सरासरी आकार घटण्याची शक्यता एकूण शेतधारणांत 17.23 दशलक्षांची वाढ ही मुख्यतः सीमांत गटामुळे आहे, ज्यामुळे सरासरी कृषीआकार कमी होत असल्याचा निदर्शनास येते.

**निष्कर्ष :**

भारतीय कृषी अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विकास हे परस्परावलंबी व अविभाज्य घटक आहेत. ग्रामीण भारतातील बहुसंख्य लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषीवर अवलंबून असल्याने कृषी क्षेत्रातील उत्पादनक्षमता, उत्पन्न स्थैर्य आणि रोजगार संधी या घटकांचा ग्रामीण विकासावर प्रत्यक्ष परिणाम होतो. अभ्यासातून असे स्पष्ट होते की, कालानुरूप कृषी कामगारांचा वाटा कमी होत असून शेतमजुरांचे प्रमाण वाढत आहे, जे ग्रामीण दारिद्रय, भूमिहीनता आणि संरचनात्मक असमतोल दर्शविते. तसेच, दारिद्रयाच्या प्रमाणात घट झाली असली तरी ग्रामीण-शहरी आणि राज्यांदरम्यान लक्षणीय असमानता कायम आहे.

**शिफारसी :**

1. प्रति व्यक्ती जमीन उपलब्धतेतील घट व भूमी तुकडीकरण लक्षात घेता, जमीन एकत्रीकरण, शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी शेती इ. प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.
2. कृषी कामगारांचा घटता वाटा व शेतमजुरांचे वाढते प्रमाण हे ग्रामीण दारिद्र्याचे द्योतक आहे. त्यामुळे ग्रामीण बिगर-कृषी रोजगार, कृषीपूरक उद्योग, सूक्ष्म-लघुउद्योग व कौशल्य विकास कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.
3. ग्रामीण रस्ते, साठवणूक सुविधा, कृषी बाजारपेठा, ई-नाम, शीतगृह व्यवस्था व डिजिटल पायाभूत सुविधा यांचा विकास केल्यास शेतकऱ्यांचा बाजारप्रवेश सुधारून उत्पन्न वाढीस मदत होईल.

**समारोप :**

कृषी अर्थव्यवस्था व ग्रामीण विकास हे परस्परावलंबी घटक असून एकाचा विकास झाल्या शिवाय दुसऱ्या घटकाचा विकास शक्य नाही. अद्ययावत तंत्रज्ञान, समावेशक धोरणे, शाश्वत संसाधन व्यवस्थापन व प्रभावी अंमलबजावणी यांच्या माध्यमातूनच ग्रामीण भारताचा समतोल विकास साध्य होऊ शकतो.

भविष्यातील धोरणांनी उत्पन्न स्थैर्य, सामाजिक समावेशन व पर्यावरणीय शाश्वतता यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा योजना, मृदा आरोग्य कार्ड, सूक्ष्मसिंचन अभियान, ग्रामीण रस्ते योजना, मनरेगा, राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन, ई-नाम इ. योजनांनी उत्पन्न स्थैर्य, बाजार प्रवेश व रोजगार निर्मितीस हातभार लावला आहे. तरीही अंमलबजावणीतील गुणवत्ता व समन्वय वाढविण्याची गरज आहे.

## संदर्भग्रंथ सूची आणि संकेतस्थळे :

1. Agricultural Statistics at a Glance (2024-25), Ministry of Agriculture & Farmers Welfare, Government of India. Pp. 2
2. Census of India (2011), Office of the Registrar General & Census Commissioner, Ministry of Home Affairs, Government of India.
3. Economic Survey of India (2025-26), Ministry of Finance, Government of India.
4. Satyanarayana M. R. (2018), 'Agricultural Crisis and farmers-friendly in India' New Century Publications, New Delhi. Pp. 18-19
5. Venu G. & Veena R. (2024), 'Diversification of India's Rural Economy: A Study of Rural Non-Farm Employment.' International Journal of Development Research. Vol. 14, Issue, 12 http://www.journalijdr.com/
6. शेटे, आर. बी. (2021), 'भारतातील ग्रामीण विकासातील समस्या' Knowledge Resonance, A Half Year National Peer-Reviewed Research Journal, (Jan-June), Vol. 10 No. 1 Pp. 299-300
7. www.agriwelfare.gov.in

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*